**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 18.03.2025** **वार-शुक्रवार**

---

**शिवछत्रपती पुरस्कार**

शिवछत्रपती पुरस्कार एकप्रकारे आपण केलेल्या मेहनतीला राजमान्यता आहे. ही राज मान्यता मिळाल्यानंतर आपल्याला शांत बसता येणार नाही. खेळाच्या विकासात योगदान देणं आणि दिशा दाखवणं हे कार्य पुरस्कार विजेत्यांना करावं लागणार आहे. अशी अपेक्षा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केली.

सन 2022-23 आणि 2023-24 या वर्षासाठीच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण कार्यक्रम आज पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी इथं पार पडला त्यावेळी ते बोलत होते. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्याच्या अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी भरीव तरतूद करण्याची मागणी खेळाडूंनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. त्याला उत्तर देताना,

येणाऱ्या पुरवणी मागण्यांमध्ये क्रीडा विभागाची कसर भरून काढण्यात येईल असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिलं.

विद्यार्थी आणि खेळाडूंसाठी मैदानं उपलब्ध व्हावीत तसंच त्यांना सर्व पायाभूत सुविधा मिळाव्यात. जेणेकरून देशाला चांगली खेळाडू मिळतील. असं मत राज्यपालांनी यावेळी व्यक्त केलं.

माजी राष्ट्रीय कबड्डीपटू, संघटक शंकुतला खटावकर आणि माजी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू प्रदीप गंधे यांना जीवनगौरव तर पॅरा ऑलिम्पिक पदक विजेता सचिन खिलारी, जागितिक विजेते आर्चर आदिती स्वामी,ओजस देवतळे , क्रिकेटपटू शिवम दुबे, ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल यांना  शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<u>चापेकर स्मारक</u>**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सहयोगाने आणि क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीच्या वतीने उभारलेल्या क्रांतिवीर चापेकर बंधू जीवन प्रसंग दृक्-श्राव्य संग्रहालयाचे लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झाला.

क्रांतिवीर चापेकर बंधू हे छत्रपती शिवरायांच्या चरित्रामुळे भारावलेले होते. चापेकर बंधूंनी इंग्रज अधिकारी रॅंडचा केलेला वध या घटनेने स्वातंत्र्य लढ्यातील जाज्वल्य इतिहास रचला गेला आणि त्यानंतर क्रांतिकारकांची एक मोठी पिढी निर्माण झाली, असं मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले.

इतिहासाला साजेसं  असं  स्मारक तयार होईल उपमुख्यमंत्री पवार यावेळी म्हणाले.

**<u>गुडफ्रायडे</u>**

प्रभू येशू ख्रिस्ताचा बलिदान दिन म्हणलेच गुड फ्रायडे निमित्त विविध चर्चमध्ये आज प्रभू येशूची प्रार्थना करण्यात आली. देशात आणि जगामध्ये सुख,समाधान,शांती, बंधूभाव, आपुलकी, प्रेम,करूणा नांदो अशी प्रार्थना ख्रिश्चन धर्मिय नागरिकांनी केली.

**<u>भांडारकर हस्तलिखिते</u>**

पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातील सहा हस्तलिखितांचा

समावेश युनेस्कोच्या ‘मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर’ मध्ये झाला आहे. दोन हजार वर्षांपूर्वी रचलेल्या भरतमुनींच्या नाट्यशास्त्र या ग्रंथाचे एक हस्तलिखित तसेच भगवद्गीतेची काश्मीरी शारदा लिपीतील पाच हस्तलिखिते यांची विशेष नोंद युनेस्कोने नुकतीच घेतली आहे.

**<u>स्वच्छता अभियान</u>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पुण्यातील एकलव्य प्रभात शाखेच्या वतीने वेताळ टेकडी परिसरात आज' 'प्लॅस्टिक कचरा स्वच्छता

अभियान’ आयोजित करण्यात आले होते. या अभियानात 400 किलो कचऱ्याचे संकलन करण्यात आलं.

**<u>नदी पुनरुज्जीवन</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं मुळा, पवना, इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक शेखर सिंह यांनी पर्यावरण विषयावर काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्थांची बैठक महानगरपालिकेमध्ये घेतली.
सांडपाणी व्यवस्थापनासंदर्भात पुढील दहा वर्षांतील शहरातील परिस्थिती काय असेल, याचा विचार करून एसटीपी प्लॅन केले असल्याचं आयुक्त सिंह यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

**श्रद्धा-लौकिका**

जोडून सुट्ट्या आल्यामुळे पुणे मुंबई द्रुतगती महामार्ग आज सकाळी वाहनांची कोंडी झाली. द्रुतगती महामार्गावर खंडाळा घाटात सकाळी ७ ते ८ किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

**आपटेनिधन**

संस्कृत विषयाचे गाढे अभ्यासक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉक्टर प्रभाकर पांडुरंग आपटे यांचं काल ठाणे इथं वृद्धापकाळाने निधन झालं. ते 92 वर्षाचे होते. पुण्यातील डेक्कन कॉलेज इथं त्यांनी दीर्घकाळ संस्कृत विषयाचे अध्यापन केले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे ते सदस्य होते. भारतीय इतिहास संकलन समितीचे ते दीर्घकाळ कार्यवाह होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 अंश तर किमान तापमान 21 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचं अनुमान पुणे वेधशाळेनं वर्तवलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**